RNI No. MAHBIL/2009/36619
Reg. No. MH/MR/South-346/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ४, अंक ५१] शुक्रवार, सप्टेंबर २८, २०१२/आश्विन ६, शके १९३४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

## असाधारण क्रमांक १४९

## प्राधिकृत प्रकाशन

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ सप्टेंबर २०१२

### अधिसूचना

क्रमांक टिपीबी. ४३१२/५२६/प्र.क्र. ४६/२०१२/नवि-११.—ज्याअर्थी, कुलाबा विभागातील भूकर क्र. २१० (पैकी), धारण करणारी ३६.८९ चौ.मी. सोबतचे नकाशात निळ्या रंगाने सीमांकित केलेली जमीन (यापुढे " उक्त जमीन " असा उल्लेख केला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असा उल्लेख केला आहे) च्या कलम ३१ उप-कलम (१) अन्वये शासन नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक टिपीबी-४३८९/२४५/युडी-११ (आरडीपी), दिनांक २० जुलै १९९० अन्वये मंजूर केलेल्या व दिनांक १ सप्टेंबर १९९० पासून अंमलात आलेल्या बृहन्मुंबईच्या 'अे' विभागाच्या सुधारित विकास योजनेत (यापुढे " उक्त विकास योजना " असा उल्लेख केला आहे) ' महानगरपालिका प्राथमिक शाळा ' या सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित आहे. (यापुढे " उक्त सार्वजनिक उपयोग " असा उल्लेख केलेला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त अधिनियमाच्या कलम १२६ चे उप-कलम (१) अन्वये उक्त योजनेमधील उक्त जमिनीचे संपादन उक्त सार्वजनिक उपयोगासाठी करण्याकरिता राज्य शासनाकडे दिनांक ६ सप्टेंबर २०१२ रोजी अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे असे मत आहे की, उक्त जमीन उक्त सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीची द्यावयाची नुकसानभरपाई संपूर्णपणे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे अदा केली जाणार आहे ;

त्याअर्थी, भूमीसंपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक) च्या कलम ६ च्या उपबंधानुसार आणि संलग्न उक्त अधिनियमाचे कलम १२६ मधील उप-कलम (२) व उप-कलम (४) द्वारे प्राप्त अधिकारान्वये असे अधिसूचित करण्यात येत आहे की, उक्त जमिनीची, उक्त सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यकता आहे ;

भूमीसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ३ खंड (क) खालील यापुढील उक्त जमिनीबाबत संपादनविषयक सर्व कार्यवाही करण्यास्तव जिल्हाधिकारी यांची कामे पार पाडण्यासाठी [ या अधिनियमामध्ये कलम (७) मधील कार्य जमेस न धरून ] उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक-७, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांना याद्वारे नियुक्त करण्यात येत आहे ;

उक्त जमिनीचा नकाशा उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) क्रमांक-७, मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा, प्रतापगड को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, विनायक अपार्टमेंट, हाफकिनसमोर, पहिला मजला, परळ व्हिलेज, मुंबई ४०० ०१२ यांच्या कार्यालयात निरीक्षणासाठी उपलब्ध राहील.

**अनुसूची**

जिल्हा व विभाग अथवा ज्यामध्ये जमीन समाविष्ट आहे, कुलाबा विभाग, मुंबई शहर.

| भूकर क्रमांक | आवश्यक असणाऱ्या जमिनीचे क्षेत्रफळ अंदाजे (चौ. मीटर मध्ये) | सार्वजनिक उपयोग ज्यासाठी जमीन आरक्षित आहे. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २१० (पैकी) | ३६.८९ | महानगरपालिका प्राथमिक शाळा (मोठ्या आरक्षणाचा भाग असलेली.) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बाणाईत,**

शासनाचे अवर सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 27th September 2012

*NOTIFICATION*

No. TPB. 4312/526/CR-46/2012/UD-11.—Whereas, land admeasuring 36.89 sq.mt. bearing C.S. No. 210 (pt.) of Colaba Division, Mumbai as shown bounded in blue on the accompanying plan (hereinafter referred to as " the said land ") which is reserved for Municipal Primary School (Part of a larger reservation) (hereinafter referred to as " the said Reservation ") in the Revised Development Plan of ' A ' Ward of Greater Mumbai (hereinafter referred to as " the said Development Plan ") sanctioned by the Government in Urban Development Department *vide* Notification TPB. 4389/245/UD-11 (RDP) dated 20th July 1990 in accordance with the provision of sub-section (*1*) of section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act ") which came into force with effect from 1st September 1990 ;

And whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai, being the Planning Authority, has made an application on 6th September 2012 to the State Government under sub-section (*1*) of the section 126 of the said Act, for acquiring the said land for the purpose specified in the said Development Plan ;

And whereas, the Government is satisfied that the said land is needed for the said public purpose ;

And whereas, the compensation to be awarded for the acquisition of the said land is to be paid wholly by the Municipal Corporation of Greater Mumbai ;

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*4*) read with sub-section (*2*) of section 126 of the said Act and read with section 6 of the Land Acquisition Act, 1894 (1 of 1894), the Government of Maharashtra hereby declares that the said land is needed for public purpose ;

The Deputy Collector (Land Acquisition) No. 7, Mumbai and Mumbai Suburban District is hereby appointed under clasue (*c*) of Section 3 of the Land Acquisition Act, 1894 to perform the functions of the Collector (not being the functions under section 7 of that Act) for all the proceedings hereinafter to be taken in respect of the said land ;

The plan showing the said land may be inspected in the office of the Deputy Collector, (Land Acquisition) No. 7, Mumbai and Mumbai Suburban District, Pratapgad Co-operative Housing Society Ltd., Vinayak apartment, Opp. Haffkine, First floor, Parel Village, Mumbai 400 012.

*Schedule*

District, Area or locality in which the said land is situated at Colaba Division, Mumbai City.

| Cadastral Survey No. (1) | Apporoximate area of the land needed (in sq.mt.) (2) | Public purpose for which the land is reserved. (3) |
|---|---|---|
| 210 (pt) | 36.89 | Municipal Primary School (Part of larger reservation) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANAIT,
Under Secretary to Government.

... GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, ... CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF ... STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM ...